# प्रेस नोट

दि. ३०/०१/२०१४.

दिनांक ३१.०१.२०१४ रोजी महाराष्ट्र शासनाचे वतीने ऐरोली नॉलेज पार्क, पटनी येथील मैदानावर राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचा शुभारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून सदर कार्यक्रमास अनेक अतिमहत्वाचे व्यक्ती (VVIPs/VIPs) मुंबई, ठाणे, रायगड, नवी मुंबई परिसरातून तसेच मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी आणि मोठया प्रमाणावर जनसमुदाय उपस्थित राहणार आहे.

सदर कार्यक्रमाचे पार्श्वभुमीवर ठाणे–बेलापूर मार्गावरील वाहतूकीत दिनांक ३१.०१.२०१४ रोजी सकाळी १०.०० ते रात्रौ २२.०० वा. दरम्यान खालील प्रमाणे बदल करण्यात येणार आहे:

१) ठाणे–बेलापूर मार्ग ट्रक/टेंपो, मालवाहू अवजड वाहने, टॅकर्स, ट्रेलर्स कंटेनर्स तसेच सिलेंडर वाहून नेणारी वाहने यांच्याकरीता पूर्णत: बंद ठेवण्यात येणार आहे.

२) दिवा सर्कल ते पटणी जंक्शन मार्गे ठाणेकडे जाण्याकरीता आणि ठाण्याकडून पटणी जंक्शन मार्गे दिवासर्कल येथे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना सदरचा मार्ग बंद ठेवण्यात येणार आहे. **(रिक्षा/कार व तत्सम फक्त हलक्या वाहनांनी ठाणे–बेलापूर मार्गाचा वापर करावा)**

३) कळंबोली सर्कल, उरण फाटा, महापे जंक्शन या मार्गावरुन ठाणे–बेलापूर रोडने जाणाऱ्या वाहनांनी खालील पर्यायी मार्गाचा वापर करावा.

<u>पर्यायी मार्ग:</u>

(अ) पुणे/गोवा बाजूकडुन ठाणे/गुजरातकडे जाणारी वाहने कळंबोली सर्कल – रोडपाली जंक्शन – नावडेफाटा – रोहिंजन टोलनाका – धानसर – शिळफाटा – मुंब्रा बायपास मार्गे इच्छीत स्थळी.

(ब) पुणे बाजुकडून एक्स्प्रेस वे मार्गे ठाणे/गुजरातकडे जाणारी वाहने एक्स्प्रेस वे च्या कळंबोली सर्कलला उतरणाऱ्या मार्गिकेवरुन उतरुन कळंबोली सर्कल – रोडपाली जंक्शन – नावडेफाटा – रोहिंजन टोलनाका – धानसर – शिळफाटा – मुंब्रा बायपास मार्गे इच्छीत स्थळी.

(क) जेएनपीटी कडून ठाणे/गुजरातकडे जाणारी वाहने गव्हाणफाटयाहून एनएच–४बी मार्गे पाडेघर – माणघर – डी पॉईंट – चिंचपाडा ब्रिज – कर्नाळा स्पोर्टस् जंक्शन – कळंबोली सर्कल – रोडपाली जंक्शन – नावडेफाटा – रोहिंजन टोलनाका – धानसर – शिळफाटा – मुंब्रा बायपास मार्गे इच्छीत स्थळी.

(ड) वाशी/एपीएमसी मार्केट येथून जाणारी वाहने सायन–पनवेल मार्ग – सानपाडा जंक्शन – तुर्भे फ्लायओव्हर – जुईनगर – नेरुळ फ्लायओव्हर – उरणफाटा – सीबीडी फ्लायओव्हर – खारघर फ्लायओव्हर – पुरुषार्थ पेट्रोलपंप – रोडपाली लिंक रोडने नावडेफाटा – रोहिंजन टोलनाका – धानसर – शिळफाटा – मुंब्रा बायपास मार्गे इच्छीत स्थळी.

नवी मुंबई वाहतूक विभागातर्फे वाहतूकीत करण्यात आलेला बदल हा दिनांक ३१.०१.२०१४ रोजी सकाळी १०.०० ते रात्रौ २२.०० वा. पर्यंत अंमलात राहील.

नवी मुंबई वाहतूक पोलीसांतर्फे सर्व ट्रक/टेंपो, मालवाहू अवजड वाहने, टॅकर्स, ट्रेलर्स कंटेनर्स तसेच सिलेंडर वाहून नेणारी वाहनांचे मालक/चालक यांना नमुद कालावधीत व वेळेत आपली वाहने सदर मार्गावर आणु नयेत व नवी मुंबई वाहतूक विभागास सहकार्य करावे याबाबत आवाहन करण्यात आले आहे.

**( विजय पाटील )**
पोलीस उप आयुक्त, (वाहतूक),
नवी मुंबई

प्रति,
मा.संपादक,––––––––––––––––

२/– मा.संपादक यांना विनंती करण्यात येते की, जनतेच्या माहितीसाठी वर नमूद माहिती आपल्या वृत्तपत्रात प्रसिध्द करून नवी मुंबई वाहतूक नियंत्रण विभागास सहकार्य करावे.